## वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

### राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) ८ वी बैठक गुरूवार, दि.३०.११.२०२३ चे इतिवृत्त.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) ची ८वी बैठक गुरुवार, दि.३०.११.२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे येथे संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या समितीच्या सदस्य व अधिकाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाकडून राज्यात सन २०२१-२२ मध्ये १४४ प्राथमिक प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ८६ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना या पुर्वीच्या बैठकांमध्ये मंजुरीची शिफारस करण्यात आलेली आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता प्राप्त असलेले जिल्हानिहाय सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करणे व परिपुर्ण प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) च्या मान्यतेस सादर करण्याकरीता वाल्मी, औरंगाबाद येथील प्राध्यापक व मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखा, कृषि आयुक्तालय, पुणे येथील कृषि उपसंचालक व कृषि अधिकारी यांना वसुंधरा कार्यालयाचे आदेश क्र.१६९/२०२३ दि.३१/३/२०२३, परिपत्रक क्र. १९२/२०२३ दि.१२/४/२०२३, आदेश क्र. ४०६/२०२३ दि.२९/८/२०२३ अन्वये आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार संबधित प्राध्यापक व अधिकारी यांनी जिल्हानिहाय प्राप्त २५ सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करून योग्य असलेल्या १४ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC)च्या दि.३०.११.२०२३ रोजीच्या ८ व्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे शिफारशीस्तव सादरीकरण करण्यात आले. सादरीकरण करण्यात आलेल्या १४ प्रकल्पांपैकी ७ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC)ची मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

सभेचे प्रास्ताविक सदस्य सचिव तथा अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. त्या वेळी त्यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

१. सविस्तर प्रकल्प अहवाल हा योजनेचा अत्यंत महत्वपुर्ण घटक असून गुणवत्तापुर्वक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेले असावेत.
२. सविस्तर प्रकल्प अहवालांचे सादर करताना विहीत प्रपत्रातील सर्व भाग सादर करण्यात यावेत.
३. काही प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकायं हे संस्थांमार्फत तयार करून घेत असून संस्थेचा प्रकायं सोबत समन्वय दिसून येत नाही.
४. प्रकल्पांतील निवडलेली गावे जल परिपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणलोट कामांचे नियोजन करण्यात यावे अशा सुचना अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.

२३।१

५. सदस्य सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे परिपुर्ण सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात यावेत. अर्धवट तसेच त्रुटीयुक्त सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात येवू नये. त्रुटीयुक्त सविस्तर प्रकल्प अहवालांना बैठकीमध्ये शिफारस करण्यात येणार नाही.

**राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) ८ वी बैठक दि.३०.११.२०२३ रोजी सादर करण्यात आलेले सविस्तर प्रकल्प अहवाल**

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC)चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपुर | Chandrapur(WDC.2)/5/2021-22 | 4300.93 | 946.20 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्रीम. नीलीमा मंडपे यांनी केले. FPO तयार करण्यासाठी प्रेरक प्रवेश उपक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. फळबाग लागवडीचे क्षेत्र वाढविण्याबाबत अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सूचना दिल्या असता बांधांवर वृक्ष लागवड होत परंतू सलग लागवड करणे शक्य होत नसल्याचे सादरीकरणावेळी सांगितले. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| २ | चंद्रपुर | Palghar(WDC.2)/6/2021-22 | 4024.14 | 885.31 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्रीम. नीलीमा मंडपे यांनी केले. क्षेत्र उपचारा करीता जास्त निधी प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. ओघळ उपचारावर फारच कमी निधी प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. त्यावेळी प्र.व्य. तथा जिल्हा जल संधारण अधिकारी यांनी ओघळ उपचार प्रस्तावीत करण्यास वाव नसल्याचे तसेच पुर्वी कोल्हापुरी बंधाऱ्यांची कामे झालेली असल्याचे सादरीकरणावेळी सांगितले. क्षेत्र उपचाराची सर्व कामे पुर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच भात खाचरांकरीता २०१३ चे आर्थिक मापदंड वापरण्याच्या सूचना दिल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस |

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC)चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | करण्यात आली. |
| ३ | बुलढाणा | Buldhana(WDC.2)/6/2021-22 | 2632.37 | 579.12 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री.मुंढे यांनी केले. प्रकल्पाच्या प्राथमिक प्रकल्प अहवालामध्ये व सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेले उपचार क्षेत्र तंतोतंत जुळले असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे उपचार क्षेत्राची पुन्हा तपासून खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच अस्तित्वातील सिमेंट नाला बांधाचे खोलीकरण ही बाब अभिसरणांतर्ग प्रस्तावीत करण्याच्या सूचना दिल्या. सदर त्रुटी पुर्तता करून सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना दिल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| ४ | बुलढाणा | Buldhana (WDC.2)/2/2021-22 | 3646.43 | 801.42 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री.मुंढे यांनी केले. सविस्तर प्रकल्प अहवामध्ये प्राथमिक प्रकल्प अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवालानुसार क्षेत्र फरकाची आकडेवारी दुरूस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ५ | बुलढाणा | Buldhana (WDC.2)/5/2021-22 | 2683.83 | 590.44 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री.मुंढे यांनी केले. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ४७% तरतुदी नुसार नियोजन केलेले नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पाणलोट जल परिपुर्ण होणार |

२५५

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC)चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | नसल्याने पुनश्च: उपचार क्षेत्र तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच २० टक्के क्षेत्रापर्यत फळबाग व वृक्ष लागवड करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| ६ | बुलढाणा | Buldhana (WDC.2)/3/2021-22 | 2498.59 | 549.69 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री.मुंढे यांनी केले. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ७ | बुलढाणा | Buldhana (WDC.2)/1/2021-22 | 4141.71 | 911.18 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री.मुंढे यांनी केले. स.प्र. अहवालामध्ये भौगोलिक क्षेत्रामध्ये बदल केलेला दिसून आला. सादरीकरणावेळी प्र.व्य. तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी प्राथमिक प्रकल्प अहवालामध्ये क्षेत्र चुकीचे दर्शविलेले आहे असे सांगितले. क्षमता नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे पाणलोट कामांच्या बाबी प्रकल्पांत वाव असताना समावेश केलेला नसल्याचे दिसून आले. सलग समतल चर /खोल सीसीटी यां बाबींचा वाव असूनही पकल्पांत समावेश केलेला नसल्याचे निदर्शनास आले. सदर त्रुटी पुर्तता करून सदर सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| ८ | बीड | Beed (WDC.2)/3/2021-22 | 4129.41 | 908.47 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री.परांडे यांनी केले. इतर योजनांमधून पुर्वी झालेली पाणलोटांची कामे प्रकल्पांत दर्शविण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ९ | रत्नागिरी | Ratnagiri (WDC.2)/7/2021-22 | 4124.03 | 1154.73 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. सुहास गायकवाड यांनी केले. प्राथमिक |

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC)चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रकल्प अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवालातील उपचार क्षेत्रामध्ये कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे उपचार क्षेत्र पुनश्च तपासणी करून खात्री करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. क्षेत्र उपचारामध्ये फक्त शेततळयाची कामे प्रस्तावीत केलेली आहेत. तसेच ओघळ उपचारामध्ये अनघड दगडी बांधांची कामे प्रस्तावीत केलेली असल्याने मजगीची कामे करण्यास वाव असल्याचे दिसून आले. त्यामुळे मजगीची कामे प्रस्तावीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सदर त्रुटी पुर्तता करून सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| १० | गडचिरोली | Gadchiroli (WDC.2)/1/2021-22 | 4062.15 | 1137.63 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. इंगोले यांनी केले. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ११ | गडचिरोली | Gadchiroli (WDC.2)/2/2021-22 | 3315.84 | 928.44 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. इंगोले यांनी केले. बोडी नुतनीकरणाची कामे अभिसरणांतर्गत प्रस्तावीत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच उपचार क्षेत्राचे पुनश्च सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना दिल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| १२ | गडचिरोली | Gadchiroli (WDC.2)/3/2021-22 | 3840.85 | 1075.44 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. इंगोले यांनी केले. बोडी नुतनीकरणाची कामे अभिसरणांतर्गत प्रस्तावीत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. |

२८५

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC)चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सदर त्रुटी पुर्तता करून सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना दिल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| १३ | नांदेड | Nanded (WDC.2)/3/2021-22 | 2964.02 | 652.08 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. कटके यांनी केले. नाला खोलीकरणाची कामें अभिरणांतर्गत प्रस्तावीत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सदर त्रुटी पुर्तता करून सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील बैठकीत फेर सादर करण्याच्या सूचना दिल्या. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली नाही. |
| १४ | नांदेड | Nanded (WDC.2)/4/2021-22 | 3990.99 | 878.02 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. कटके यांनी केले. सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |

(रवींद्र भोसले)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
PMKSY-WDC-२.०

(वि.बा. नाथ)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
PMKSY-WDC-२.०

Vasundhara Watershed Development Agency, Pune

PMKSY-WDC 2.0 projects DPRs recommended in 8 th SLTC Meeting held on 30.11.2023

| Sr.No | District | Name of Project | Name of PIA | As per PPR | | | | | As per DPR | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No of GPs | No of Village | No. of MWS | Treatment Area | Project Cost | No of GPs | No of Village | No. of MWS | Treatment Area | Project Cost |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | Chandrapur | Chandrapur (WDC-2.0)/5/2021-22 | Taluka Agricultur Officer, Nagbhid, taluka Nagbhid Dist Chandrapur | 10 | 14 | 14 | 4419.92 | 972.38 | 10 | 14 | 18 | 4300.93 | 946.20 |
| 2 | Chandrapur | Chandrapur (WDC-2.0)/6/2021-22 | Circle Agriculture Officer, Nagbhid Taluka Ngbhid Dist-Chandrapur | 11 | 21 | 17 | 4049.05 | 890.79 | 11 | 21 | 17 | 4024.14 | 885.31 |
| 3 | Buldhana | Buldhana (WDC-2.0)/2/2021-22 | Sub Divisional Water Conservation Officer, Soil and Water Conservation, Sub Division Chikhli | 5 | 6 | 13 | 3784.18 | 832.52 | 5 | 6 | 15 | 3646.73 | 801.42 |
| 4 | Buldhana | Buldhana (WDC-2.0)/3/2021-22 | Circle Agriculture Officer, Bibi, Taluka Lonar Dist- Buldhana | 3 | 4 | 21 | 2498.59 | 549.69 | 3 | 4 | 15 | 2498.59 | 549.69 |
| 5 | Beed | Beed (WDC-2.0)/3/2021-22 | Circle Agriculture Officer, Madalmohi, Taluka Georai Dist- Beed | 4 | 4 | 24 | 4512.00 | 992.64 | 4 | 5 | 24 | 4129.41 | 908.47 |
| 6 | Gadchiroli | Gadchiroli (WDC-2.0)/1/2021-22 | Circle Agriculture Officer, Etapalli, Taluka-Ettapalli Dist- Gadchiroli | 4 | 20 | 47 | 4062.95 | 1137.63 | 4 | 18 | 47 | 4062.15 | 1137.63 |
| 7 | Nanded | Nanded (WDC-2.0)/4/2021-22 | Circle Agriculture Officer, Kinwat, Taluka-Kinwat Dist- Nanded | 5 | 5 | 12 | 4013.94 | 883.07 | 5 | 5 | 12 | 3990.99 | 878.02 |

२०१९

36/d